# बाबूजी आव्हाड महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियान उत्साहात




**पाथर्डी, दि. ४ (प्रतिनिधी)** - शहरातील बाबूजी आव्हाड महविद्यालयात रस्ते सुरक्षा अभियान उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित डेरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, गोपनीय विभागाचे भगवान सानप, राहुल खेडकर, संदीप नागरगोजे उपस्थित होते.

सध्या शहरात व महामार्गावर वाहतुकीची समस्या वाढत असून, वाहनचालकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. त्यामुळे वाहतूक कोंडी तसेच अपघात होत आहेत.

त्यामुळे अनेक नागरिकांना आपला प्राण गमवावा लागत आहे. रस्त्यांच्या कडेला अस्ताव्यस्त पद्धतीने वाहने लावण्यामुळेही त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. यातून मार्ग काढणे व प्रबोधन होण्यासाठी हे अभियान राबविले जाते. विद्यार्थ्यांनीही वाहतूक नियम पाळून सहकार्य करावे, असे आवाहन डेरे यांनी केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रा. शेखर ससाणे यांनी केले, तर आभार प्रा. देवेंद्र कराड यांनी मानले.